RNI No: MAHMAR/2004/13776 :: Postal Registration No: MH / MR / NW-35 / 2014-2016
Published On : 12 November 2015 :: Posted at Kandivli(W) Post Office, Mumbai on 14 November, 2015

# अजायब ✵ बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : तेरा | अंक : पाचवा | नोव्हेंबर २०१५



धन्य अजायब (सत्संगाच्या कार्यक्रमांची माहिती) 4

दिवाळी (सत्संग) 5

बाबा सोमनाथजी महाराजांच्या संगतला संदेश 27

अनमोल वचन (संदेश) 33

मालक, मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व संपादक श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई – 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई – 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.

# धन्य अजायब

## मुंबई शहरातील सत्संगाचा कार्यक्रम

गुरुप्रिय साधुसंगत,

परमसंत अजायब सिंहजी महाराजजींच्या अपार कृपेने यंदा मुंबई शहरात सत्संगाचा कार्यक्रम **बुधवार दि. ६ जानेवारी २०१६ पासून रविवार दि. १० जानेवारी २०१६** पर्यंत खालील पत्त्यावर होईल. सर्व गुरूप्रेमी बंधु–भगिनींच्या चरणी नम्र विनंती आहे की बाबाजींच्या मधुर आठवणीत होणाऱ्या या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी ५ जानेवारी २०१६ रोजी सायंकाळी किंवा ६ जानेवारी २०१६ रोजी सकाळी खालील पत्यावर पोहचून नामस्मरणाचा तसेच संत वचनांचा लाभ घ्यावा. परमपुज्य संत अजायब सिंह महाराजजींचा **भंडारा १० जानेवारी २०१६** रोजी साजरा केला जाईल.

**भूराभाई आरोग्य भवन,**
**शांतीलाल मोदी मार्ग, मयुर सिनेमाजवळ,**
**कांदिवली (पश्चिम), मुंबई ४०० ०६७**
**फोन नं.: ०९३२४६७०३०१, ०९८३३००४०००, ०२२–२४९६५०००**

## सन्तबानी आश्रम १६ पी एस राजस्थान येथील कायक्रम

**२७ नोव्हेंबर ते २९ नोव्हेंबर २०१५**
**२५ डिसेंबर ते २७ डिसेंबर २०१५**
**२ फेब्रुवारी ते ६ फेब्रुवारी २०१६**

***

# दिवाळी

सत्संग: परमसंत अजायब सिंहजी महाराज, गुरू रामदासजी महाराजांची वाणी,
संत बानी आश्रम, १६ पी एस राजस्थान – ३ नोव्हेंबर १९९४

मी त्या शब्दस्वरूपी परमात्मा सावन–कृपालजींच्या चरणी करोडो वेळा नमस्कार करतो. गुरू नानक देवजींनी त्यांच्या गुरूंसमोर प्रार्थना केली की:

***फिरत–फिरत प्रभ आया परया तुम शरणाई।***
***नानक की प्रभ बेनती अपनी भक्ति लाई।।***

आपल्या हृदयात वारंवार असा विचार येतो की भक्ती करणे काय अवघड आहे? जेव्हा आपल्या हृदयास भक्ती करावीशी वाटेल तेव्हा आपण भक्ती करू. परंतु ज्या महात्म्यांचे आंतरिक नेत्र उघडलेले असतात, त्यांना कल्पना असते की ज्या परमात्म्याने या जगाची निर्मिती केली आहे, त्या परमात्म्याने यास बेवारस न सोडता, त्यासाठी खूप नियम बनविलेले आहेत. जसे सुर्योदय व चंद्रोदय होणे, हवेचे वाहणे, वादळ येणे, वेळ झाल्यावर मृत्यु येणे, या सर्व गोष्टी त्या नियमांनुसारच होत असतात.

गुरू नानकदेवजी महाराज सांगतात,''आपण आपल्या इच्छेनुसार ना जगू शकतो, ना मरू शकतो. हे सर्व परमात्म्याने अगोदरच सुनिश्चित केलेले असते.''आपण हे सर्व दररोज पाहतो, अनुभवदेखील करतो, परंतु संतांचा अनुभव दर्शवतो की, जेव्हा परमात्म्याची अत्यंत कृपा होते, तेव्हाच आपण भक्ती करू शकतो. परमात्म्याने असादेखील नियम स्वत:च्या हातात ठेवला आहे की तो स्वत:च्या मर्जीनुसार एखाद्यास भक्तीपासून दुरावू शकतो वा एखाद्यास भक्तीमार्गावर आणू शकतो.

सर्वसाधारणपणे कोणत्याही कामाची सुरुवात करण्यापूर्वी आपण एखादा शुभमुहूर्त व मंगलकाळ पाहतो. ते काम सुरू करताना पुजा–प्रार्थनादेखील करतो व दान देखील करतो.

संत महात्मा आपणांस प्रेमाने सांगतात की तीच वेळ सर्वोत्तम असते जेव्हा परमात्माप्रिय सतगुरूंशी आपली भेट होते व ज्यावेळी ते आपणांस शब्द–नामाशी जोडतात ती वेळ त्याहूनही उत्तम असते. परंतु आपण खऱ्या अर्थाने जेव्हा त्यावेळेचा सद्उपयोग करतो, ती वेळ त्याहीपेक्षा उत्तम असते.

संत–सतगुरू आपणांस शब्द–नामाची कमाई करण्याचा उपदेश देतात. जेव्हा आपण त्यानुसार शब्द–नामाची कमाई करतो व त्यांच्या आदेशांचे पालन करू लागतो, तेव्हा आपण वेळेचा सद्उपयोग करतो. संत–महात्मा सांगतात की, कथनीत (वाक्तव्यात) पारांगत व्यक्ती आपणांस जागोजागी सापडतील. कारण प्रत्येक मनुष्य असा विचार करतो की माझ्या वक्तव्याने मी इतरांच्या अंतरात अथवा स्वत:च्या अंतरात वैराग्य निर्माण करीन.

अनेकदा आपण पाहतो की जे राग गातात किंवा कथाकथन करतात, तेव्हा लोकांवर छाप पाडण्यासाठी ते स्वत: अश्रू ढाळू लागतात आणि इतरांनाही रडवितात. इतरांना असे वाटते की हे खूप मोठे वैरागी आहेत, यांनी नक्कीच परमात्म्यास प्राप्त केले असावे. परंतु संतमतात अशा वैराग्यांना कोणतेही स्थान नसते, त्यांचे काहीच महत्त्व नसते. गुरू नानक सांगतात:

***गल्ली किन्हें न पाया, न भीजे रागी न कोई बेदी।***

आपण सांगता की तुम्ही कितीही रागांचे गायन केले वा उच्च स्वर काढले तरी परमात्मा तुमच्या या कर्मांमुळे खुष होत नाही. आपणांस कल्पना आहे की शेती करायची असली तरी तेथे मेहनतीची आवश्यकता असते. मेहनती शिवाय व्यापारदेखील करता येत नाही. या जगामधील कोणतेही कामकाज करायचे असल्यास आपणांस परिश्रम घ्यावे लागतात. खाणीमध्ये खोदकाम केल्यानंतरच सोने प्राप्त होते, मोती काढण्यासाठी खोल समुद्रात बुडी मारावीच लागते. परंतु जेव्हा नाम–साधनेची वेळ येते तेव्हा आपण म्हणतो की, अजून सतगुरूंनी कृपा केली नाही किंवा अजून आपली कमाई करण्याचा योग आलेला नाही! तेव्हा संत म्हणतात बरं बांधवा! परमात्मा कृपा नक्की करेल.

आपण कधी विचार केला का की जर या जगातील कोणतेही कामकाज मेहनत आणि परिश्रमाशिवाय होत नाही, तर आपण परमात्म्याची भक्ती झोपेत वा गप्पा मारीत करू शकतो का? भक्तीसाठीदेखील मेहनत आणि परिश्रमाची गरज असते किंबहुना इतर सर्वसाधारण कामासाठी लागणाऱ्या मेहनतीपेक्षाही जास्त मेहनतीची गरज भक्तीसाठी असते. कारण या जगाच्या कामकाजामध्ये आपले मन अगोदरपासूनच गुंतलेले आहे, चोवीस तास आपल्या मनाचा झुकाव त्याकडेच असतो. त्यामुळे भक्ती करण्यासाठी तेथून मन हटविण्यासाठी खूप संघर्ष करावा लागतो.

मी माझा स्वत:चा अनुभव सांगतो की, तोफेसमोर उभे राहणे सोपे आहे कारण लोक आपली वाहवा करीत असतात की हा खूप धाडशी आहे, परंतु नामाची कमाई करणे याहूनही खूप कठीण असते. जेव्हा ध्यान–अभ्यासासाठी आपण बसतो, त्यावेळी मन सिंह बनून समोर उभे राहते व म्हणते की, मी तुला ध्यान–अभ्यासासाठी बसू देणार नाही. ज्या लोकांनी असा संघर्ष केला आहे, त्यांना तुम्ही त्यांच्या आयुष्यातील अनुभव विचारा.

जेव्हा दुसरे विश्वमहायुद्ध झाले, तेव्हा माझे वय कमी होते. मिलेटरीत मला बॉईज कंपनीमध्ये भरती केले गेले होते. बॉईज कंपनीमध्ये असणाऱ्यांना लढाईसाठी जावे लागत नाही. परंतु माझ्या हृदयात देशसेवा करण्याची तीव्र इच्छा, प्रेम व जोश होता. मी स्वखुषीने लढाईसाठी माझे नाव नोंदविले.

त्या दिवसांमध्ये महाराज सावन सिंहजींद्वारे ऐकले होते की देशसेवा सर्वश्रेष्ठ आहे. देशसेवा करताना जर कोणाचा मृत्यु झाला, तर तो स्वर्गापर्यंत जातो. आम्ही त्यावेळी स्वर्गास खूप उच्च समजत होतो. लढाईत जाण्यासाठी जेव्हा मी माझे नाव नोंदविले, तेव्हा माझे वय लहान असल्याने तेथील प्रत्येकजण मला न्याहाळून पाहत होता. त्यांना आश्चर्य वाटत होते की, लहान वयाचा हा बालक किती धाडसी आहे? याने लढाईमध्ये जाण्यासाठी स्वत:चे नाव का बरे नोंदविले?

त्यावेळी लोकांचे मनोधैर्य खूप खचलेले होते. जेव्हा आमची वैद्यकीय तपासणी केली गेली तेव्हा डॉक्टरने कमांडरला विचारले,''तुम्ही सल्ला द्यावा की मी आहारामध्ये कोणा-कोणास दूध द्यावे?'' तेव्हा अश्रुंनी भरलेल्या नेत्रांनी पाहत आमचा कमांडर म्हणाला,''हे सर्वजण बळी चढविण्यासाठी नेले जाणारे बकरे आहेत. तू सर्वांनाच दूध देत जा.''

त्यावेळी हिटलर हल्ला करीत वेगाने पुढे सरत होता. तो म्हणत असे की अमुक ठिकाणी उद्या सकाळचा चहा पिऊ, दुसऱ्या दिवशी ते ठिकाण जिंकून तो तेथे पोहचत असे. तुम्ही पहा! शत्रूवर विजय मिळविण्यासाठी किती कत्तल होते, किती मानवी हत्या होते? मला आठवते की आम्ही नाभा प्रांतातील करागृहामधील कैद्यांना आणण्यासाठी गेलो होतो की ज्यांना सैन्यात भरती व्हायचे असेल त्यांनी आमच्यासोबत यावे. त्या कैद्यांनी वीस-वीस वर्षे कारागृहात रहाण्याची सजा भोगणे कबुल केले, परंतु ते सैन्यात भरती झाले नाहीत.

ज्यावेळी महाराज कृपालजींनी माझे नेत्र बंद करून या ठिकाणी गुहेत ध्यान-अभ्यासासाठी बसविले आणि म्हणाले,''प्रिय मुला! मी स्वत: तुझ्याकडे येईन.'' त्यावेळी मन सिंह बनून समोर उभे राहत असे. महाराज सावन सिंहजीदेखील सांगत असत,''मन तोफेसमोर उभे राहण्यासाठी तयार असते, परंतु भजन-अभ्यास करण्यासाठी ते कधी राजी नसते.''

आपण मेहनत करण्यासाठी कुचराई करतो, बहाणे करतो की आपली अजून भजन-अभ्यास करण्याचा योग आलेला नाही, संतगुरूंची अजून कृपा झाली नाही. प्रियजनहो! सतगुरू याहून आणखीन काय आपल्यावर कृपा करणार? ते आपला देश व वेष त्यागून आत्म्यास नेण्यासाठी मल-मुत्राचे शरीर धारण करून नेहमीच या जगामध्ये येत असतात. त्यांनी आपणांस मोफत शब्द-नाम दिले. पुन्हा ते असेही म्हणत नाहीत की पुढे तुम्ही एकटेच जा. ते सांगतात,''मुला! धाडस कर, नामस्मरण करीत माझ्याकडे ये!''

शाळेपर्यंत जाणे ही मुलाची स्वत:ची जबाबदारी आहे. शाळेत गेल्यावर शिक्षक शिकवतील. आपली शाळा आपल्या दोन नेत्रांच्या मध्यभागी आहे. आपल्या मनाची आणि आत्म्याची गाठ तीसऱ्या तिळावर बांधलेली आहे. आपण शाळेत तर जात नाही. नुसते बसल्या जागेवरून तक्रार करीत रहातो की, अजून सतगुरूंची कृपा झाली नाही, आपला भजन-अभ्यासाचा सुयोग आलेला नाही. हा केवळ आळस असून, आपल्या मनाचा बहाणा आहे.

संत-महात्मा आपणांस प्रेमाने सांगतात की ज्यादिवशी आपली परमात्मा प्रिय संतांशी गाठ पडते, तो दिवस आपल्यासाठी सर्वोत्तम पवित्र दिवस आहे. गुरू अर्जुनदेवजी महाराज सांगतात:

***जां दिन भेटे साध संग,उहाँ दिन बलिहारी।***

ज्यादिवशी एखाद्या परमात्म्याच्या प्रिय संतांशी माझी गाठ पडली, त्या दिवसावर मी माझे सर्वस्व अर्पण करतो, माझे बलिदान देतो. तुमच्यासमोर गुरू रामदासजी महाराजजींची वाणी सादर केली जात आहे, जी लक्षपूर्वक ऐकण्यासारखी आहे. आपण सांगत आहात की, आपल्या मनाचे आणि आत्म्याचे आसन दोन नेत्रांच्या दरम्यान आहे. येथून आपले मन क्षणोक्षणी बाह्यजगात जाते. आपल्या मनाची आणि आत्म्याची गाठ बांधलेली असल्याने, आपले मनच जर या जागेवर स्थिर होत नसेल, तर अंतर्यात आपण कशी बरे प्रगती करू शकू? संत-महात्मा आपणांस प्रेमाने सांगतात की, आपण बाहेर जाणाऱ्या मनास कशा तऱ्हेने वळवायचे आहे व कशा तऱ्हेने मन आणि आत्म्याची गाठ सोडवायची आहे?

सुरुवातीला आपला आत्मा निर्मळ आणि पवित्र होता. त्याच प्रमाणे मनाने कोणतेही कर्म केलेले नसल्याने, त्यावेळी त्याच्यावर कोणताही मळ चढलेला नव्हता. परंतु जस-जसे आत्मा आणि मन बाह्यजगात मिसळत गेले, त्यांच्यावर कर्मांचे ओझे वाढत गेले. त्यामुळे आता मन आणि आत्मा आपापल्या घरास विसरून गेले आहेत.

संत-महात्मा याजगात ना कोणता नवीन मार्ग घेऊन येतात ना कोणता धर्म बनविण्यासाठी येतात. ते केवळ आपल्या मनास, आपल्या आत्म्यास, त्यांच्या विसरलेल्या ठिकाणी पोहोचविण्यासाठी येतात. ते आपणांस आठवण करून देण्यासाठी आलेले असतात की प्रिय मुलांनो! हे तुमचे खरे घर नाही, हा तुमचा खरा धर्म नाही. कल्पना नाही की आपली मुले यापूर्वी देखील किती जन्मांमध्ये आपली मुले होऊन गेली. आपण पशु-पक्ष्यांच्या जन्मात असतानाही आपणांस मुले होती. आपण आपल्या जन्मांनुसार भोग भोगत असतो, चांगले-वाईट अन्न ग्रहण करीत असतो.

जगात असेही कुत्रे असतात, जे चांगल्या महालांमध्ये राहातात, चांगले अन्न खातात. तसेच जगात असेही कुत्रे असतात ज्यांना गल्लीमध्ये मैलदेखील खाण्यास मिळत नाही. त्याचप्रमाणे अशीही माणसे आहेत जी चांगल्या महालांमध्ये राहातात, उत्तम अन्न ग्रहण करतात व अशीही माणसे आहेत जी रस्त्यावर उपाशी रडत फिरत असतात. त्यांच्याकडे ना वापरण्यासाठी कपडे असतात, ना आंघोळीसाठी सोय असते, ना त्यांना पोटभर जेवण मिळते. आपण प्रत्येक जन्मामध्ये ऐश्वर्य, सुखं-दु:खं भोगत आलेलो आहोत. मनुष्य जन्म आणि इतर जन्मांमध्ये हाच फरक आहे की जी परमात्म्याची भक्ती आपण इतर जन्मांमध्ये करू शकत नाही, ती मनुष्यजन्मामध्ये करू शकतो.

महात्मा सांगतात की मन आणि आत्म्याची एकमेकांशी गाठ बांधलेली आहे. जोपर्यंत आपण ही गाठ सोडवत नाही, आत्म्याची मनाच्या बंधनातून सुटका करीत नाही तोपर्यंत आपला आत्मा स्वगृही परत जाऊ शकत नाही. ही मन आणि आत्म्याची गाठ आपण कशी सोडवू शकतो? जे मन क्षणोक्षणी बाह्यजगात पळते अशा बाह्यजगात विखुरलेल्या मनास नामस्मरणाद्वारे नेत्रांच्या मागे तीसऱ्या तिळावर एकाग्र करावयाचे आहे. त्यास महात्म्यांनी आपापल्या निरनिराळ्या भाषेत अनेक नांवे ठेवलेली आहेत. कोणी त्यास तीसरा तिळ तर कोणी घराचा दरवाजा तर कोणी त्यास मुक्तीचे द्वार असे संबोधले आहे.



महाराज सावन सिंहजी सांगत असत,''काठीला कोणी दांडा म्हणा वा लाठी म्हणा, अर्थ एकच होतो. येथे महत्त्वाचे हे आहे की, तुम्ही तुमच्या संसारात विखुरलेल्या विचारांना एकाग्र करून सातत्याने महात्म्यांनी दिलेल्या नामाचे स्मरण करावयाचे आहे. नामस्मरण करण्यासाठी ना जोर लावावा लागतो ना ओझे उचलावे लागते. आपण घरात काम करीत असताना, आपले मन कल्पना करीतच असते. येथे बसलेलो असताना, आपले शरीर भलेही येथे बसलेले असो, परंतु मन मात्र निरनिराळ्या कल्पना करीत असते. नोकरी करणाऱ्यांच्या समोर त्याच्या कार्यालयातील फाईल्स समोर येतात. दुकानदारी करणाऱ्याच्या समोर त्याची गिऱ्हाइके येत राहातात. शेतकऱ्याच्या समोर शेताची कामे उभी राहातात.

महात्मा आपणांस प्रेमाने समजावतात की आपण जी रात्रंदिवस सांसारिक कार्यांची कल्पना करीत असतो, त्याऐवजी आपण नामस्मरणाची कल्पना करीत राहावे! सुरुवातीला आपणांस जिव्हेच्या मदतीने नामस्मरण करावे लागते. एखादे मुल शाळेत जाते तेव्हा त्यास सुरुवातीला मुखाने ए, बी, सी म्हणावी लागते. परंतु जेव्हा त्याची जिव्हेला सवय लागते, तेव्हा त्यास मुखाने बोलण्याची गरज पडत नाही.

आम्ही सैन्यात असताना पावले लक्षात राहाण्यासाठी सुरुवातीला आमच्या कडून लेफ्ट–राईट, लेफ्ट–राईट बोलून घेत असत. नंतर सवय झाल्यावर बोलण्याची काय गरज? सर्वजण चालत राहातात. याचप्रमाणे सुरुवातीला आपल्या जिव्हेला नामस्मरणाची सवय झालेली नसते. तेव्हा एखादी मोजणी केल्याप्रमाणे ते मोजावे लागते. जेव्हा जिव्हेला नामस्मरणाची सवय होते, तेव्हा आपणांस ते आठवण्याची गरज पडत नाही, जिव्हा हलवायचीही गरज पडत नाही कारण कल्पनेप्रमाणेच आपल्या अंतर्यात ते चोवीस तास सुरू राहते.

जेव्हा नामस्मरणाची सवय मनास लागते, तेव्हा तेच नामस्मरण करण्याची आत्म्यासही सवय लागते. मग आपण भलेही समाधी अवस्थेमध्ये गेलो, तरी ते विजेच्या तारेप्रमाणे हलत राहाते.आपण जर ठाम राहून चालता–फिरता, उठता–बसता, रात्रंदिवस मनाने नामस्मरण केले तर आत्मा आपोआपच नामस्मरण करू लागतो.

जेव्हा आपले नामस्मरण अशा तऱ्हेने होऊ लागते, आपण जेव्हा अभ्यासासाठी बसतो तेव्हा आपले लक्ष ताबडतोब तीसऱ्या तिळावर येते. आपल्याला पाय आखडून बसण्याची गरज पडत नाही. आपोआपच आपणांस शब्द–ध्वनी ऐकू येतो. आपणांस त्यास शोधण्याची गरज पडत नाही. कारण येथे तो ध्वनी चोवीस तास येत असतो. खरेतर शब्द आतादेखील तेथे निनादत आहे, परंतु आपण त्या ठिकाणी एकाग्र झालेलो नाही.

महात्मा सांगतात की आपल्या अंतरामध्ये दोन शक्ती आहेत. एक निरत आणि दुसरी सुरत. पाहू शकण्याच्या शक्तीस निरत म्हणतात आणि ऐकू शकणाऱ्या शक्तीस सुरत म्हणतात. यास गुरुसाहेब म्हणतात:

***अंतर जोत निरंतर बाणी सचे साहिब स्यों लिव लाई।***

आपण जेव्हा आपले जगात विखुरलेले लक्ष आपल्या नेत्रांमागे एकाग्र करतो, तेव्हा ती निरत शक्ती ज्योतीचे दर्शन करू लागते व सुरत शक्ती ध्वनी ऐकू लागते. अंतरामधील सर्व पडदे दूर सारून आपण जेव्हा दशम

द्वाराशी पोहोचतो, तेव्हा तेथे आपण शब्दाचे तेज पाहतो. यासच संत **दिवाळी** साजरी करणे असे म्हणतात. स्वामीजी महाराज सांगतात:

***सन्त दिवाली नित करे सतलोक के माहे।***

अंतरामध्ये लक्ष एकाग्र करतो, तीच **दिवाळी** आहे, तेथे तेज आहे, प्रकाश आहे. ऋषी-मुनींनी आपल्या अंत:करणात उत्सुकता निर्माण होण्यासाठी बाह्यजगात दिवे प्रज्वलित करून **दिवाळीचे** प्रदर्शन केले. आपण पहिल्या मंडळात पोहोचल्यावर हजारो पाकळ्यांचे झगमगणारे कमळ पाहू शकतो.

रामायणात रामास सतगुरू-परमात्मा, आत्म्यास सीता तर मनास रावण संबोधले गेले आहे. रामरूपी परमात्म्याने खूप संघर्ष करून, मेहनत व कष्ट करून मनरूपी रावणाच्या कारागृहातून सीतारूपी आत्म्याची सुटका केली. याचप्रमाणे आपले सतगुरुरूपी परमात्मा आपल्या आत्मारूपी सीतेची सुटका करण्यासाठी किती मेहनत करतात?

महाराज सावन सिंहजी सांगत असत,''वाल्मिकीने दहा हजार वर्षांपूर्वीच रामायण लिहिले होते. राम-लक्ष्मण आणि सीता हे सर्वजण नंतर जन्मले. तुम्ही अंतरामध्ये जाऊन पाहा! हा सर्व रामायणाचा खेळ आपल्या अंतर्यामध्येच होत आहे. काळाने विचार केला! जे लोक हे रामायण वाचतील, त्यानुसार अंमल करतील, ते लगेच अंतर्यात जातील. त्यामुळे काळाने लगेच जे काही रामायणामध्ये वर्णन केले आहे तो सर्व घटनाक्रम त्याच नावाने या जगामध्ये घडवून आणला. त्यामुळे कोणी आपणांस रामायणाचा खरा अर्थ समजावण्याचा प्रयत्न केला तरी आपण त्यास सत्य मानण्यास तयार होणार नाही.''

त्यामुळे संत-महात्मा आपणांस सांगतात की आपण आपले बाह्यजगात विखुरलेले लक्ष, आपल्या नेत्रांच्या मागच्या बाजूस एकाग्र करून स्थुल, सुक्ष्म आणि कारण या तिन्ही पडद्यांना दूर सारून त्रिकुटीमध्ये पोहचावे. गुरू नानकसाहेब सांगतात:

***गुरू प्रशादी त्रिकुटी छूटे चौथे पद लिव लाई।***



कोणाच्या कृपेने आपण तेथे पोहोचतो? जेव्हा संत-सतगुरु आपल्यावर कृपा करतात, आपणांस नाम देतात, तेव्हा आपले चित्त चौथ्या पदावर स्थिरस्थावर होते, तेव्हाच आपली त्रिकुटीतील ब्रह्मापासून सुटका होते. शब्द-नामाची कमाई करून आपण या ठिकाणी पोहोचतो, तेव्हा मन त्रिकुटीमध्येच मागे राहते आणि आत्म्याची मनाच्या बंधनातून सुटका होते, आत्म्याची आणि मनाची बांधली गेलेली गाठ सुटून जाते.

**मन खिन खिन भरम भरम बहु धावै तिल घर नहीं वासा पाईऐ।।**
**गुर अंकस शबद दारू सिर धारयो घर मंदर आण वसाईऐ।।**

आता गुरूसाहेब एक छान उदाहरण देऊन समजावत आहेत की हत्ती अतिशय बलवान प्राणी असतो. तो जर मोकाट सुटला तर त्याच्या वाटेत आडव्या येणाऱ्या सर्व लोकांना तुडवत जातो. हत्ती जेव्हा मद-मस्त होतो, तेव्हा तो खूप नुकसान करतो. परंतु त्यासाठी माहूत लोकांकडे लोखंडाचा तीक्ष्ण टोक असलेला अंकुश असतो. त्या अंकुशाच्या मदतीने ते हत्तीवर नियंत्रण ठेवतात. मग हत्तीला तुम्ही शाळेत जरी घेऊन गेलात, तरी तो मुलांकडे डोळे वर करूनही पाहत नाही. हत्तीवर बसून लोकं बाजारात फिरत असतात. एवढ्या बलवान जनावरास माहूत लोक अंकुशाद्वारे नियंत्रित करतात.

त्याचप्रमाणे जगाने मनावर ताबा मिळविण्यासाठी खूप प्रकारचे उपाय शोधले. मी माझ्या जीवनात खूप असे प्रकार केले आहेत. या कर्मकांडांनी मन ताब्यात राहण्याऐवजी मनामध्ये आणखीन अहंकार निर्माण होतो की मी इतके जलधारे (डोक्यावर पाण्याची धार सोडून केलेला तप) केले, धुनीतप (चोहोबाजुंनी अग्नी पेटवून केलेला तप) केला, अनवाणी पावलांनी तिर्थयात्रा केल्या आहेत. हे सर्व केल्यानंतर मन नम्र होण्याऐवजी अजून अहंकारी होते.

आता आपण प्रेमाने सांगत आहात की, आपण आपल्या मनावर ताबा मिळविण्यासाठी नामस्मरण करून त्यास त्रिकुटीमध्ये आणावे. त्रिकुटीमध्ये सतगुरूंनी दिलेला शब्द अंकुशाप्रमाणे कार्य करतो. जे मन हरणाप्रमाणे विषय-विकारांमध्ये, जगाच्या स्वादामध्ये मद-मस्त होऊन फिरत असते व ध्यान-अभ्यासामध्ये बसण्यासाठी सहजतेने तयार होत नाही, तेच मन आपली मदत करू लागते, आपला मित्र बनते.

सतगुरूंनी दिलेल्या शब्दांच्या शक्तीची आपणांस त्यावेळेस जाणीव होते ज्यावेळी आपण स्वत:स त्या शब्दामध्ये एकरूप करून टाकतो. सुरुवातीस आपण विचार करतो की, आपणांस दिला गेलेला शब्द गाण्या-वाचण्यासाठी, दिलेला आहे वा आपणांस क्षुल्लक नामच सांगितले गेले आहे. परंतु यामागे मोठे रहस्य दडलेले आहे. ही पाच पवित्र नामे त्या पाच विशाल मंडळांच्या धनींची नावे आहेत, ज्यांना आपल्या आत्म्याने पार करून जायचे आहे.

आपणांस जर अमेरिकेस जायचे असेल, तर आपणांस कल्पना असते की, आपण रोममार्गे वा लंडन मार्गे न्युयॉर्क किंवा बोस्टनला जायचे असल्यास आपणांस वाटेत कोणत्या ठिकाणी थांबावे लागेल? आपण पूर्वी जर त्या मार्गाने गेलो असल्यास, आपणांस कुणाला काही विचारण्याची गरज भासत नाही. गाडीतून जाताना रस्त्याच्या बाजूला असलेल्या माईलस्टोनवर लिहिलेले असल्यास ती माहिती वाचून आपण निर्धास्तपणे गाडी पळवत राहतो. जे प्रेमी अंतर्यात जातात, त्यांना याची कल्पना असते.

पश्चिमेमध्ये तसेच येथे देखील अनेक सुशिक्षित प्रेमी येतात. खरेतर नामदानाची वेळ अतिशय पवित्र असते. जेव्हा त्यांना नाम दिले जाते, तेव्हा ते त्या नामाची कदर न करता त्या शब्दांचा अर्थ विचारत राहतात. त्यावेळी त्यांना हसून उत्तर दिले जाते की तू जेव्हा अंतर्यात जाशील, तेव्हा तुला आपोआपच याचा अर्थ कळेल.

आपल्यासमोर जर कोणी खाद्यपदार्थ तयार करून ठेवले आणि आपण त्यास जेवणाच्या चवीबद्दल विचारल्यास काय उपयोग? सुज्ञ मनुष्य असेच उत्तर देईल की तू जेवून पाहा, तुला आपोआपच चव कळेल. अन्नाशिवाय आपण हालचाल करू शकत नाही. अन्नामुळेच आपणांस ताकद येते. आपला आत्मा जन्मोजन्मांतरापासून उपाशी आहे. शब्दामध्ये शक्ती आहे. आपण अंतर्यात गेल्यावर, तो मार्ग आपोआपच एखाद्या पुस्तकाप्रमाणे उघडेल; तेथे या शब्दांच्या अर्थांची गरजच पडत नाही.

आपण सांगत आहात की तेथे पोहोचल्यावर आपणांस कल्पना येते की, सतगुरूंचा शब्द कशा तऱ्हेने अंकुशाचे काम करतो?त्यानंतर मनरूपी हत्तीची फौज – काम, क्रोध, लोभ, मोह व अहंकार नजर वर करून पाहत नाही,ते अंकुशास घाबरतात. मनासमोर स्वादिष्ट अन्न, विषय–विकार व ऐषोआरामाच्या वस्तु जरी ठेवल्या तरी त्या वस्तू अंतर्यातील रसासमोर तुच्छ, राखेसमान वाटतात. जर एखाद्या सुज्ञास प्यावयास अमृत मिळत असेल, तर ते पिण्याऐवजी, नजरेस राख दिसत असूनही, ती राख मुखात टाकेल काय?

**गोबिंद जीओ सतसंगत मेल हर ध्याईऐ।।**

आपण सांगत आहात,''हृदयात विचार येतो की भक्ती करणे कोणते अवघड काम आहे? जागोजागी महात्मा बसलेले आहेत, जेव्हा वाटेल तेव्हा आपण भक्ती करू. परंतु ज्यांच्यावर परमात्मा कृपादृष्टी करतो तेच लोकं भक्तीमार्गाकडे वळतात.'' कबीर साहेब सांगतात:

***मैं तो उन सन्तों का दास जिन्होंने मनुआ वस में करया।***

ज्या महात्मांनी आपले मन आपल्या वशात केले आहे, हे परमात्मा माझी अशा महात्म्यांशी भेट घाल. असे महात्मा जगाचा त्याग करून, भगवे वस्त्र परिधान करून किंवा कानास छिद्र पाडून, शरीरास राख फासून बाहेर फिरत नाहीत. ते संसारात सामान्यपणे राहातात व स्वत:च्या उपजिविकेसाठी शेती किंवा व्यापार करतात. ज्याप्रमाणे एखादी माशी मधाच्या किनाऱ्यावर बसून मध खाते व उडून जाते त्याचप्रमाणे ते या जगात अलिप्त राहतात.

महाराज सावन सिंहजी सांगत असत,''एक माशी मधाच्या मधोमध येऊन बसते. त्यामुळे ती उडू शकत नाही. तिच्या पाय काढण्याच्या प्रयत्नात तिचे पंख फसतात, तर पंख काढल्यास पाय अडकतात. याचप्रमाणे आपण सांसारिक लोक जगाच्या चिखलात अशाप्रकारेच अडकतो, आपण ना भक्ती करू शकतो, ना जगाची कामे पूर्ण करू शकतो.

आपल्या घरी एखादा विवाह झाल्यास, मुल जन्मास आल्यास आपल्या आनंदास पारावार उरत नाही, आपण पार्ट्या करतो. मात्र त्याच घरामध्ये मृत्यु झाल्यास विलाप करू लागतो; उरलेल्या जीवनात खुष्क व उदास रहातो. हे जग जन्म–मृत्युचे ठिकाण आहे. येथे जन्मही होतो, मृत्युही येतो. आपण मृत्युसमयीही दु:खी होतो आणि जन्माच्या वेळेसही दु:खी असतो.

हे परमात्मा! तू आम्हांस असे वातावरण दे, जेथे आमचे बाह्यजगात विखुरलेले मन तुझ्या भक्तीत समरस होऊ देत. संगतमध्ये जाण्यासाठी आपणांस कोणते खास वस्त्र परिधान करावे लागत नाही. संगतीचा आपल्या मनावर खूप परिणाम होतो. आपण जर जुगाऱ्यांच्या संगतीत गेलो, तर आपणांस जुगार खेळण्याची सवय लागेल; मद्यपींच्या सहवासात गेलो, तर मद्यप्राशन करण्याची आपणांस सवय लागेल, तसेच जर आपण शब्द–नामाची कमाई करणाऱ्यांच्या संगतीत राहिलो, तर आपणांस 'शब्द–नामाची' कमाई करण्याची सवय जडेल.

**हौमें रोग गया सुख पाया हर सहज समाध लगाईऐ।।**



संगतमध्ये गेल्याने आपल्या अंतरातून अहंकाराचा आजार नष्ट होतो. जेव्हा आपण गरीब–श्रीमंत एकाच ताडपत्रीवर बसून अन्न ग्रहण करतो, तेव्हा आपल्या अंतरामध्ये नम्रता निर्माण करण्याची आपणांस संधी मिळते. तेथे अशी भावना आपल्या अंतरामध्ये येते की सर्वच जीव परमात्म्याने बनविलेले आहेत! मला माझ्या नेत्रांनी हे पाहण्याचा योग आला की आमच्या सैन्याचा मोठा कमांडर यमैया महाराज सावन सिंहजींना भेटावयास गेले. जनरल विक्रम सिंहदेखील महाराजजींना भेटण्यासाठी जात असत. त्यांच्यासोबत जाण्याची मला वारंवार संधी मिळत असे. महाराजजींनी त्यांना बसण्यासाठी खुर्ची मागवली. परंतु त्यांनी खाली ताडपत्रीवर बसून अन्न ग्रहण केले आणि म्हणाले,''एखाद्या महात्म्याच्या चरणी बसण्याची हीच संधी आहे.''

सच्चे पातशाह महाराज सावन सिंहजी सैनिकांवर खूप प्रेम करीत, कारण ते स्वत: सैन्यामध्ये होते. त्यांना कल्पना होती की, या लोकांना खूप कमी वेळ मिळतो, तसेच ते वेळेचे एकदम पक्के असतात.

जसे संगतमध्ये सर्वांनी एकाच ताडपत्रीवर बसून अन्न ग्रहण केल्याने आपला अहंकार दूर होतो, तसेच आपण जेव्हा लहान मोठे एकत्र शेतीची, लंगरची वा इतर सेवा करतो तेव्हा देखील आपल्या अंतरात नम्रता येते.

संत–महात्मा प्रेमाने आपणांस समजावतात,''प्रिय मुलांनो! ज्याप्रमाणे एका म्यानामध्ये दोन तलवारी राहू शकत नाहीत त्याप्रमाणे ज्यांच्या अंतरात मीपणा–अहंकार असतो, तेथे कधीच परमात्मा प्रगट होत नाही. हा तर नम्रतेचा खेळ आहे. पाणी नेहमी उतरणीच्या दिशेने वाहत असते. ते डोंगराच्या माथ्यावर न थांबता, खाली सरोवरामध्ये येऊनच थांबते.''

मी नेहमीच सांगत असतो की, भक्त जेव्हा स्वत:ची कमजोरी, स्वत:च्या पापांकडे पाहतो, तेव्हा तो आपल्या परमात्मारूप सतगुरूंपुढे अंत:करणापासून प्रार्थना करतो,''कदाचित मला माझ्या कर्मांमुळे खूप दीर्घ व कठोर शिक्षा भोगावी लागेल, कारण मी जगापासून चोरी करतो, परंतु परमात्मा ते पाहात

आहे. मी जगाचीही फसवणूक करीत राहीलो व स्वत:ची देखील फसवणूक करीत राहीलो कारण मी जगास मोठा व परमात्म्यास लहान समजत होतो. कामाग्नीने माझी मती भ्रष्ट केली आहे. हे परमात्मा सतगुरु! तू माझ्या कर्मांचा हिशोब पाहण्यापूर्वीच मला माफ कर. तू माझा हिशोब पाहिल्यास मी कधीच पात्र ठरू शकणार नाही.'' गुरू नानकदेवजी सांगतात:

***लेखा करत न छूटिए, खिन्न खिन्न भूलनहार।***
***बख्शनहारा बख्श ले, ते नानक पार उतार।।***

हे प्रभु! माझ्या कर्मांचा हिशोब देऊन माझी सुटका तर होऊच शकत नाही. मला कल्पनाही नाही की माझ्या किती जन्मांची कर्मं बाकी आहेत. आपण जेव्हा संतांच्या मुखातून अशी नम्रतामय वचने ऐकतो, तेव्हा आपल्या बाह्यजगात भ्रमलेल्या मनातही नम्रता येण्यास सुरुवात होते. आपण नेहमी विचार करतो की घराचा दरवाज बंद करून आपण कोणतीही कर्मे करण्यास काय हरकत आहे? परमात्मा कुठे पाहत आहे? मी स्वत:ची तसेच परमात्म्याची देखील फसवणूक केली आहे, कारण मी विचार करीत असे की जग मोठे असून त्यासमोर परमात्मा लहान आहे.

## घर रतन लाल बहु माणक लादे मन भ्रमया लेह् न सकाईऐ।

संत नामास लाल रत्न असे संबोधतात. परमात्म्याने सर्वांच्या अंतरामध्ये नामाचा खजिना ठेवलेला आहे. परंतु आपले मन भ्रमिष्ट होऊन बाहेर जगात फिरत आहे. आई-वडिल, बहीण-भाऊ, मालमत्ता, धन-संपत्ती असे आपण जे काही बाहेर पाहत आहोत, तो सर्व भ्रमच आहे. आपणांस कल्पना आहे की आज जी काही मुले-मुली, धन-संपत्ती आपल्याकडे आहे, ती यापूर्वी दुसऱ्या कुणाचीतरी होती. आपल्या पुर्वजांनादेखील या मालमत्तेवर खूप आपुलकी व आत्मियता होती, परंतु ते जर हे सर्व सोबत नेऊ शकले नाहीत तर आपण तरी अशी अपेक्षा का करावी? म्हणूनच आपण जे काही पाहत आहोत, तो भ्रम आहे.

परमात्म्याने आपल्या अंतरामध्ये ठेवलेला नामाचा खजिना आपण कशा रितीने प्राप्त करू शकतो? संतांनी आपल्या अंतरामध्ये काही वाटून वा मिश्रण करून प्यावयास द्यायचे नाही. आज उच्च पदावर असलेल्या न्यायाधीश वा वकीलांना विचारा की, तुमच्या शिक्षकांनी तुम्हाला काही वाटून वा मिश्रण करून प्यावयास दिले होते का? ते आपणांस हेच सांगतील की त्यांनी त्यांच्या शिक्षकांची संगत केली होती, त्यांचे सांगणे ऐकले होते. त्यामुळे ते चांगले जीवन जगत आहेत. ज्याने त्यांच्या शिक्षकांचे सांगणे ऐकले नाही तो आजही अशिक्षित राहून जगात वावरत आहे. विद्येची शक्ती त्यांच्याही अंतरात होती. परंतु ती सुप्त अवस्थेमध्ये आली आणि सुप्त अवस्थेमध्येच गेली. यासाठी भीखासाहेब सांगतात:

***भीखा भूखा को नहीं सबकी गठड़ी लाल।***
***गिरह खोल न जाणी तांतें भए कंगाल।।***

परमात्म्याने कोणासही मोकळे ठेवले नव्हते, प्रत्येकाच्या अंतरामध्ये नामाचा खजिना ठेवलेला आहे. अंतरामध्ये जाऊन आपण तो प्राप्त करून न घेतल्याने आपण कंगाल आहोत.

**ज्यों ओडा कूप गुहज खिन काढै त्यों सतगुर वस्त लहाईऐ।।**
**जिन ऐसा सतगुर साध न पाया ते धृग धृग नर जीवाईऐ।।**

जमिनीखाली दबलेल्या प्राचीन वस्तीचे ज्ञान असलेल्या लोकांना ओडा (आर्कीऑलॉजिस्ट) म्हणतात. प्राचीन वास्तुंच्या खाली पूर्वरचीत विहिरी सापडतात. त्यामुळे त्या ठिकाणी खोदकाम केल्यास आपल्यास दिसून येते की, कोण्या एके काळी तेथे घरे होती, शहरे वसत होती. त्या लोकांना सींगे असेही म्हटले जाते. ते त्यांच्या हुशारीने केवळ वास घेऊन सांगतात की, येथून माती दूर केल्यास येथे तयार विहीर सापडेल, तेथे पाणी आढळेल.

याचप्रमाणे संत-महात्म्यांनादेखील ज्ञान असते, त्यांचा स्वानुभव असतो. ते कोठून तरी ऐकलेली गोष्ट आपणास सांगत नाहीत. ते आपणांस सांगतात

की, तुम्हीदेखील प्रयत्नपूर्वक आपले जगात इतरत्र पसरलेले लक्ष दोन्ही नेत्रांच्या पाठीमागे एकाग्र करून त्यास शब्दाशी जोडल्यास तुम्हीदेखील हा लाल रत्नाचा खजिना प्राप्त करून घेऊ शकता.

आपण सांगता, मनुष्य-जन्म प्राप्त होऊनही ज्यांना असे जन्ममृत्युचे रहस्य सोडवलेले संत प्राप्त झाले नाहीत, त्यांचे या जगामध्ये येणे व्यर्थ आहे.

**जनम पदारथ पुंन फल पाया कौडी बदलै जाईऐ।।**

आपल्या सत्कर्मांचा जेव्हा खूप मोठा संचय तयार होतो, तेव्हा परमात्मा आपणांस मनुष्य-जन्म बक्षीस म्हणून देतो. परमात्मा आपणांस सांगतो, हे बघ प्रिया! तुला माझी भेट घेण्यासाठी मी तुला ही संधी दिली आहे. परंतु तू मात्र कवडीमोल सांसारिक कामकाजामध्ये, मान-पानामध्ये, विषय-विकारांमध्ये मोहून गेला आहेस.'' परमात्म्याने आपणांस दिलेल्या मनुष्य-जन्माचे मोल आपणांस उमगत नाही. आपण म्हणतो:

***ऐह जग मिट्ठ अगला किन डिट्ठा।***

**मधुसूदन हर धार प्रभ किरपा कर किरपा गुरु मिलाईऐ।।**

आपण सांसारिक लोक परमात्म्यापुढे प्रार्थना करतेवेळी कोणी धन-संपत्ती, कोणी अपत्य, कोणी उच्च पदांची तर कोणी मान-पानाची मागणी करतो. परंतु ज्यांचे नेत्र उघडलेले असतात ते म्हणतात, ''हे परमात्मा! तू जर आमच्यावर कृपा करणार असशील, तर आमची सतगुरूंशी भेट घडव.''

मी सांगत असतो की बालपणी, मला जेव्हा खास समजही नव्हता त्यावेळी मी जेव्हा कधी बाहेर एकांतामध्ये जात असे, तेव्हा मी विचार करी की ते कसे प्रेमी होते ज्यांना गुरू नानकदेवजी किंवा गुरू गोविंद सिंहजींचे दर्शन लाभले होते. मी शिख परिवारामध्ये जन्मलो असल्याने माझ्या घरामध्ये वारंवार दहा गुरूंबद्दल चर्चा होत असे. त्या चर्चेच्या प्रभावामुळेच मी एकटा फिरत असताना विचार येत असे की, ज्यांना सतगुरूंच्या चरणी बसण्याची संधी लाभली, ते लोक किती भाग्यवान होते? परंतु ऐकण्यास असेदेखील

मिळाले की, अनेक लोकांनी सतगुरूंचा त्यागही केला होता. मग विचार येई की या लोकांची किती वाईट कुकर्मे होती? माझ्या हृदयात बालपणापासूनच असे विचार येत की मलादेखील एखादे सतगुरू भेटतील का? मला त्यांच्या चरणी बसण्याची संधी लाभेल का?

सच्चे पातशाह महाराज कृपाल सांगत असत, ''भुकेलेल्यासाठी भाकर आणि तहानलेल्यासाठी पाणी मिळणे हा निसर्गाचा नियम आहे, त्यांना ते नक्कीच मिळते.''आपण जर भाकरीची मागणी केली तर परमात्मा तिची तजबीज नक्कीच करतो. त्याचप्रमाणे सतगुरूंची भेट व्हावी म्हणून साद घातल्यास, आपली साद परमात्मा नक्कीच ऐकतो.

मी सांगत असतो की, माझ्या जीवनामध्ये ना त्यांचे गुणगान करणारा भेटला, ना त्यांची निंदा करणारा कोणी भेटला. हे त्यांनाच माहित आहे की माझ्यासाठी पाचशे किलोमीटर दूरवरून प्रवास करून माझ्यावर कृपावर्षाव करण्यासाठी कसे ते आले? माझे नाव त्यांना कसे समजले हे मला माहित नाही. त्यांनी स्वत:च त्यांच्या प्रेमींना माझ्यासाठी निरोप देऊन पाठविले की मी घरीच थांबावे, ते मला भेटण्यासाठी येत आहेत. मी त्यांना म्हणालो, ''मी तुमच्याशी काय बोलावे, हेच मला समजत नाही. माझे अंत:करण आणि बुद्धी रिक्त आहे.'' महाराजजी म्हणाले, ''माझ्याकडे बौद्धिक कुस्ती करणारे अनेक पहिलवान आहेत. मी तुझी असलेली रिक्त जागा पाहूनच तुझ्याकडे आलो आहे.''

म्हणूनच आपण सांगत आहात, ''हे परमात्मा! तू माझ्यावर कृपा कर, माझी गाठ अशा सतगुरूंशी करून दे, जे माझे अंत:करण जाणतात.'' परमात्मा सर्वांचे अंत:करण जाणतो, परंतु आपण ती वस्तु मागत नाही. आपण जर परमात्म्याचीच मागणी केली तर तो स्वत:च येईल, परंतु आपण तर या जगातील खेळण्यांच्या मागे लागलेलो आहोत.

**जन नानक निरबाण पद पाया मिल साधु हर गुण गाईऐ।।**



गुरूसाहेबांनी आपणांस या लहानशा वाणीमध्ये सांगितले आहे की, आपले मन कशा तऱ्हेने एखाद्या हरणाप्रमाणे बाह्य जगाकडे धावत आहे, आपण त्यास कशा रितीने नामस्मरणाच्या मदतीने नेत्रांच्या मागे एकाग्र करायचे आहे, कशा तऱ्हेने आपण सतगुरूंनी दिलेल्या शब्दाची कमाई करावयाची आहे, कशा तऱ्हेने स्वत:चा अहंकारापासून बचाव करायचा आहे? शब्द–नामाची कमाई हा एकच उपाय आहे.

आपण प्रेमाने सांगत आहात की, आपणांस मिळालेला मनुष्य–जन्म हा खूप सत्कर्मांचे बक्षीस म्हणून तो परमात्म्याने दिलेला आहे. मनुष्य–जन्म प्राप्त होऊनही ज्यांना सतगुरू भेटले नाहीत, त्यांचा या जगामध्ये येण्याचा उद्देश सफल झालेला नसतो. परमात्म्याने प्रत्येकाच्या अंतरामध्ये नामाचा खजिना ठेवलेला आहे, परंतु सतगुरूंच्या चरणी न गेल्याने, आपण त्याचा फायदा करून घेऊ शकत नाही. आपण त्यास गमावून बसतो. मी अगोदरच सांगितले आहे:

***गुरू प्रसादी त्रिकुटी छूटे चौथे पद लिव लाई।***

सतगुरुंच्या कृपेनेच आपण त्रिकुटीपासून स्वत:ची सुटका करून घ्यावयाची आहे. आपण जेव्हा त्या ठिकाणी पोहचतो. तेव्हा मनाच्या बंधनातून आत्म्याची सुटका होते, त्यांच्या दरम्यानची गाठ सुटते. त्यानंतर दशमद्वारी पोहचल्यावर आपण शब्दाचे तेज, सतगुरुंचे तेज पाहतो.

***सन्त दिवाली नित करे सतलोक के माहे।***
***और मते सब काल के यू हीं धूल उड़ाए ।।***

स्वामीजी महाराज सांगत आहेत, ''जे लोक तेथे पोहोचतात, ते नेहमीच **दिवाळी** साजरी करतात. आपण जी **दिवाळी** बाहेर पाहतो, ती ऋषी-मुनींनी आपणांस समजावण्यासाठी साजरी केली आहे. त्या मागे खूप मोठे रहस्य दडलेले आहे.

ज्या ठिकाणी गेल्यावर आपल्या सर्व आशा-मनिषा नाहीशा होतात, त्या ठिकाणास निर्वाण पद म्हटले गेले आहे. निर्वाण लोकांचा एक पंथदेखील आहे. मी असे म्हणत नाही की मुला-मुलींना त्यागून, घरामधील स्वकमाईचे अन्न त्यागून लोकांसमोर हात पसरत फिरावे. आत्म्यावरील स्थुल, सुक्ष्म आणि कारण हे तिन्ही पडदे दूर सारून, आपण जेव्हा पुढे दशमद्वारी पोहचतो, तेव्हा तेथे आपण परमात्म्याचरणी रत होतो. आपले लक्ष जेव्हा शब्दामध्ये एकरूप होते, तेव्हा आपल्या अंतरामध्ये शब्द प्रगट होतो. मग आपले लक्ष या जगापासून निराळे होऊन ते परमात्म्याशी एकरूप होते. जेथून शब्द येत असतो, त्या ठिकाणी आपला आत्मा पोहचतो. महात्मा यास निर्वाणपद म्हणतात. म्हणूनच गुरू रामदासजी महाराजांनी या वाणीत जे काही प्रेमाने आपणांस समजावले आहे, त्यानुसार शब्द-नामाची कमाई करून आपण आपले जीवन पवित्र बनवावे. आपणांस जी काही संधी लाभली आहे, तिचा पुरेपूर फायदा करून घ्यावा.

***



# बाबा सोमनाथजी महाराजांच्या संगतला संदेश

परमसंत अजायब सिंहजी महाराजांद्वारे बाबा सोमनाथजी महाराजांनी स्थापीत केलेल्या सत्संग हॉल विषयी संगतला संदेश – वरळी, मुंबई १९७८

हा हॉल बाबा सोमनाथजींनी संगतच्या सेवेसाठी बनविला होता. मी कालदेखील सत्संगामध्ये सांगितले होते:

***तरवर सरवर सन्तजन चौथे बरसे मेह । पर स्वार्थ के कारणे चारो धारे देह ।।***

कबीर साहेब सांगत आहेत, ''संत संसारात जीवांचे कल्याण करण्यासाठी येतात. त्यामागे त्यांचा स्वत:चा कोणताही स्वार्थ नसतो, तसेच ते कर्मांच्या बंधनांमुळे या संसारात येत नाहीत.'' संत याजगात येऊन संसारास प्रभुला भेटण्याचा मार्ग दर्शवितात. ते संसारातून जाताना देखील हाच सल्ला देऊन जातात की तुम्ही जर या मार्गाने चालत राहिलात तर तुमचा फायदा होईल.

आपणांस कल्पना आहे की या संसारात कबीर साहेब, गुरु नानकदेवजी, स्वामीजी महाराज, जयमल सिंहजी महाराज, सावन सिंहजी महाराजांसारखे मोठ–मोठे संत–महात्मे आले, परंतु कोणतेही महात्मा या जगात कायमस्वरूपी राहिले नाहीत, कारण या विश्वाची रचनाच तशी आहे. प्रत्येकास त्याच्या जीवनाचा कालावधी पूर्ण झाल्यावर, ही संसार यात्रा पूर्ण करून जावे लागते. एखादा दहा दिवस अगोदर तर एखादा दहा दिवसांनंतर जातो, परंतु प्रत्येकास जावे नक्कीच लागते. कबीर साहेब सांगतात:

***सन्त मुए क्या रोईऐ जो अपने गृह जाए । रोवो साकत बापुरे जो हाटो हाट बिकाए ।।***

संत जेव्हा या जगाचा त्याग करून जातात, तेव्हा आपण का रडावे, का पश्चाताप करावा? कारण ते तर स्वगृही, सचखण्डात गेलेले असतात. खरेतर आपण साकत (सांसारिक, दुष्कर्मी व निगुऱ्या) व्यक्तींसाठी रडावे, जे ठिक–ठिकाणी जन्म घेत राहतात. बाबाजी येथून गेले याचा अर्थ असा होत नाही की आपण त्यांच्या शिकवणूकीपासून दूर जावे, त्यांचे स्मरण करू नये

किंवा त्यांचे नांवच घेऊ नये. त्यांच्या ठिकाणाचा सांभाळ करणारा, त्यांचे नाव उज्वल करणाराच खरा त्यांचा सुपुत्र असतो. ते सचखण्डामध्ये असूनही तुमची तेथे वाट पाहत आहेत. ते येथून गेल्यानंतरही आपले कर्तव्य आहे की आपण त्यांचे कार्य पुढे चालूच ठेवावे.

सतगुरू शिष्यास नामदान दिल्यानंतर त्यास वाऱ्यावर सोडत नाहीत. जोपर्यंत ते शिष्याच्या आत्म्यास सचखण्डात नेत नाहीत तोपर्यंत ते निश्चिंत होत नाहीत. महाराज सावन सिंहजींना या इहलोकाची यात्रा पूर्ण करून अनेक वर्षे झालेली आहेत, परंतु ज्यांना त्यांनी नाम दिले, त्या आत्म्यांना आजही त्यांच्यापासून लाभ मिळत आहे. जे लोक महाराज सावन सिंहजींनी दर्शवलेल्या मार्गावर चालत आहेत, त्यांना आजदेखील लाभ मिळत आहे, त्यांच्यावर आजदेखील कृपावर्षाव होत आहे.

याचप्रमाणे तुम्ही जर बाबा सोमनाथजी महाराजांनी दर्शवलेल्या मार्गावर चालत राहीलात तर तुम्हांसही त्यांचे प्रेम आणि आशीर्वाद प्राप्त होत राहील. मी कालदेखील तुम्हांस हेच सांगितले होते की मी येथे तुम्हांस त्यांच्याशी जोडण्यासाठी आलेलो आहे, तोडण्यासाठी नव्हे. खरेतर त्यांच्याप्रती तुमचे असलेले प्रेम मी आणखीन पक्के करण्यासाठी आलेलो आहे. यास तुम्ही बाबा सोमनाथजींचा आशीर्वाद समजा, ज्यांनी पश्चिमी प्रेमींना प्रेरणा दिली.

पश्चिमेकडून आलेल्या सत्संगी बंधुंना येथील कोणत्याही गोष्टीची लालुच नाही. ते तुमच्या जागेचा ताबा घेण्यासाठी आलेले नाहीत तसेच आम्हीदेखील या जागेचा ताबा घेण्यासाठी आलेलो नाही. आमच्याकडे सतगुरूंनी दिलेले सर्वकाही आहे. आमच्या उदरनिर्वाहासाठी सतगुरूंनी पूरेपूर व्यवस्था केलेली आहे. आमचा येथे येण्याचा वा या लोकांनी मला येथे आणण्याचा उद्देश, केवळ शब्द-नामाची कमाई करणे व बाबाजींनी दर्शवलेल्या मार्गास अजून पुढे वाढविण्याचाच आहे. कबीर साहेब सांगतात:

***सन्त सन्त को दो कर जानी सो जन जान नर्क की खानी ।।***

अंतर्यातून सर्व संत एकच असतात. कोणी संत पन्नास वर्षे, पाचशे वर्षे वा पाच हजार वर्षांपूर्वी येऊन गेलेले असोत, ते एकाच घरामधून म्हणजे सचखण्डातून परमेश्वराच्या आदेशाने येतात आणि परमेश्वराच्या आदेशाचाच प्रचार करतात. आपण नामाची कमाई न करता निरनिराळे गट बनवितो. कोणी म्हणतो मी अमुक–अमुक संतांचा सेवक आहे. आपण नामाची कमाई करीत नसल्यामुळेच असे म्हणत असतो. आपण जर नामाची कमाई केली, तर आपल्या अंत:करणातील अशा शंका–कुशंका सर्व निघून जातात.

प्रेमींनी जो काही कार्यक्रम बनविला आहे, आता त्याबद्दल मी सांगतो. यंदा पश्चिमेतील थोडेच प्रेमी आलेले आहेत. डिसेंबर महिन्यामध्ये मी या प्रेमींबरोबर तीन दिवसांऐवजी एका आठवड्याचा कार्यक्रम ठेवला आहे. ते आपणांस खूप मदत करतील तसेच यांच्याशिवाय इतर अनेक लोकदेखील तुम्हांस सहकार्य देतील. यांनी मला तसे सांगितले आहे, तसेच मी यांना परवानगीदेखील दिलेली आहे की, राजस्थानऐवजी हे मुंबईस येऊ शकतात व येथील कार्यक्रमानंतर ते राजस्थान कार्यक्रमासाठी जाऊ शकतात.

तुमचे कर्तव्य आहे की तुम्ही अधिकाधिक ध्यान–अभ्यास करा, गप्पा–गोष्टी कमी करा. तुम्ही असा विचार करू नका की बाबा सोमनाथजी आपणांस सोडून गेले आहेत. मी खात्रीने तुम्हांस सांगतो की बाबाजींचा आशीर्वाद तुमच्या सोबत आहे. बाबाजींच्या आशीर्वादामुळेच आम्ही येथे सत्संगासाठी आणि तुमच्या संगतीमध्ये आलेलो आहोत.

पश्चिमी प्रेमींच्या अंतरामध्ये बसूनच बाबाजींनी त्यांची चावी फिरवली की संगत भरकटत चालली आहे, संगतला आमची माहिती द्यावी. या संबंधी पश्चिमी प्रेमींनी मुंबईतील लोकांना माहिती दिली. सर्वप्रथम पॉलने त्याच्या पत्नीस नाम देवविले, जेणेकरून प्रेमींना खात्री व्हावी की बाबाजींची कृपा आहे. आपलेदेखील कर्तव्य आहे की बाबाजींच्या कृपेचा आपणदेखील फायदा करून घ्यावा.

पुढीलवेळी मी तुमच्यामध्ये येईल, तेव्हा तुम्ही जास्तीत–जास्त ध्यान–अभ्यास केलेला आहे असे दिसावे जेणेकरून मला तुम्हांस भेटून आनंद व्हावा की बाबा सोमनाथजींच्या संगतने खूप ध्यान–अभ्यास केलेला आहे. आपण सर्वांनी आपआपसांमध्ये प्रेमभावना बाळगावी, सर्वांनी एकत्र वाटचाल करावी व एकमेकांचा आदर राखावा. जेथे संत बसतात, त्या धरतीस ते पवित्र बनवितात. स्वामीजी महाराज सांगतात:

***साध चरण अड़सठ से उत्तम, वह भूमि पवित्र जहाँ साध पग धरदे।***

एका बाजूस अडुसष्ट तिर्थ तर दुसऱ्या बाजूस संतांचे चरण आहेत. ज्या धरतीवर संतचरण पडतात, ती धरती पवित्र बनते. हा हॉल बाबा सोमनाथजींनी सत्संगासाठीच बनविला आहे. तुम्ही या हॉलचा लाभ घ्यावा. येथे सत्संग करणे तुमच्या फायद्याचे आहे. येथे तुम्ही सत्संग व ध्यान–अभ्यास करावा. येथे वाईट गोष्टींचा विचार करणेदेखील गुन्हा आहे. जर कोणास कुविचार करायचा असेल तर त्याने तो रस्त्यावर जाऊन करावा.

मी येथील आयोजकांचे हार्दिक स्वागत करतो. त्यांच्याप्रती माझ्या अंत:करणात आदर–सन्मान आहे कारण त्यांनी या जागेचा अतिशय चांगल्या पद्धतीने सांभाळ केला आहे. मी आशा करतो की पुढेही ते बाबाजींच्या आश्रमाचा याच पद्धतीने सांभाळ करतील. मी तुम्हा लोकांची सेवा करण्यासाठी तयार आहे. जर कोणाच्या ध्यान–अभ्यासामध्ये काही अडचण असेल तो अतिशय आनंदाने मला एकांतामध्ये विचारू शकतो वा पत्र पाठवून मला विचारू शकतो. तुम्ही जर हिंदी भाषेत पत्र लिहिले तर हिंदीमध्ये तुम्हांस उत्तर मिळेल आणि पंजाबी भाषेत लिहिल्यास पंजाबीमध्ये उत्तर मिळेल. पत्र लिहिताना ते संक्षिप्त व सरळ शब्दांत लिहावे.

आपण यास बाबा सोमनाथजींची कृपा माना की आज ते पुन्हा आपल्यावर कृपा करण्यासाठी ओलेले आहेत. तुम्ही आमची प्रेम–भावना समजून घेण्याचा प्रयत्न करा, आम्ही तुमच्याकडे प्रेम घेऊन आलेलो आहोत. तुमचा आश्रम

तुम्हांसच मंगलमय असो. आम्ही तुमच्या आश्रमावर ताबा घेण्यासाठी आलेलो नाही व तसे आम्ही कदापी करणार नाही. हा आश्रम बाबा सोमनाथजींचा आहे व त्यांचाच राहील. हा सतसंग हॉल संतांचा आहे. येथे येऊन तुम्ही त्याचा लाभ घ्यावा. जर कोणी तुमची बाबाजींकडे पोहचण्यासाठी मदत करीत असेल, तर त्याच्या मदतीचा सद्‌उपयोग करून घेणे वाईट गोष्ट नाही.



बाबा सोमनाथाजी महाराजांचा फोटो पाहता तुम्हांस दिसेल की त्यांनी नाम प्राप्त करण्यासाठी किती संघर्ष केला? त्यांनी जठा ठेवल्या, विवस्त्र, अनवाणी पायांनी ते फिरत राहिले आणि खूप तप केले. ही सर्व कर्मकांडे त्यांनी नामासाठी केली. ते मोठमोठ्या साधु-संतांकडे जात राहिल्याने त्यांना खरे संत भेटले. याचप्रमाणे मलादेखील हिंदुस्थानभर फिरण्याची संधी मिळाली. मी अनेक समाजांमध्ये फिरलो. परंतु एक वेळ अशी आली की मला खरे संतदेखील भेटले. आपण जर नामस्मरण केले तर आपल्या अंत:करणातील शंका-कुशंका नाहीशा होतील. मी काल सत्संगातही सांगितले होते की आपणांस शंका तोपर्यंतच येतात:

***जो जो चोर भजन के प्राणी से से दुख सहे ।***
***आलस नींद सतावें उनको नित नित भ्रम गहे ।।***

जे ध्यान-अभ्यास करीत नाहीत, ते आळशी व दरिद्री बनतात. त्यांना निद्रा, काम आणि क्रोध घेरतात. सर्वांत मोठी गोष्ट म्हणजे त्यांना भ्रम घेरून टाकतो. अशा भ्रमात कधी पडू नये. तुम्हा सर्वांनी आपआपसांत प्रेम-भावना ठेवावी, एकमेकांचा आदर करावा आणि बाबाजींवर श्रद्धा ठेवावी.

***



# अनमोल वचन

परमसंत अजायब सिंहजी महाराजांद्वारे सत्संगाच्या कार्यक्रमा अखेरीस संगतसाठी दिलेला एक महत्वपूर्ण संदेश, राजस्थान आश्रम – ७ डिसेंबर, १९८९

परमात्म्याने आपणा सर्वांना दहा दिवस त्याची भक्ती आणि प्रेम करण्याची संधी दिली. तुम्ही आपआपल्या घरी, आपआपल्या देशामध्ये गेल्यानंतरही जर तुमच्या ध्यान–अभ्यासामध्ये आणि सत्संगामधील उपस्थितीत सातत्य ठेवले तर तुम्हांस झालेला फायदा तुम्ही सांभाळू शकाल. महाराज कृपाल सांगत असत, ''शंभर कामे सोडून सत्संगास जा आणि हजार कामे सोडून ध्यान–अभ्यासासाठी बसा.''

जे प्रेमी या कार्यक्रमात सहभागी झाले तसेच ज्या बंधु–भगिनींनी या कार्यक्रमात स्वयंपाक आणि इतर सेवेत मदत केली, त्या सर्वांचा मी आभारी आहे. ही अतिशय उत्तम संधी होती, ज्यामध्ये तुम्ही सर्वांनी तन, मन आणि धनाने सेवा करून फायदा करून घेतलात. मी नेहमी सांगत असतो की संत–महात्मा परमेश्वराचे प्रेषीत असतात, ते हर–जन असतात. त्यांचा आपल्या कोणत्याही प्रकारच्या बाह्य पोषाखाशी संबंध नसतो. ते प्रत्येक आत्म्यावर प्रेम करतात. मग तो आत्मा कोणत्याही देशाचा वा धर्माचा असो.

आत्मा परमात्म्याचा अंश असून जो काही वाईटपणा असतो तो आपल्या मनात असतो. बाह्यजगातील रीतीरिवाजांशी संतांना लगाव नसतो. जगातील कोणत्याही धर्माची ते निंदा करीत नाहीत व ते त्यांच्या सेवकांनाही निंदा करण्यास शिकवित नाहीत. उलट ते आपणांस असेही सांगतात की आपण आपल्या अंत:करणात कोणाबद्दलही वाईट विचार बाळगू नये. सर्व जीव–जंतू परमात्म्याने बनविलेले असून तो सर्वांचा दाता आहे. कोणत्याही धर्माबद्दल वा मनुष्याबद्दल वाईट विचार करणारा मनुष्य स्वत:चे अधिकाधिक अध्यात्मिक नुकसान करून घेतोच, सोबत तो परमात्म्याचाही तिरस्कार करीत असतो.

मी आशा करतो की या दहा दिवसांच्या कार्यक्रमात तुम्ही जे काही ऐकले त्यावर अंमल करण्याचा तुम्ही प्रयत्न कराल. जास्त करून या कार्यक्रमात मी हेच सांगितले की आपण शरीर नसून आत्मा आहोत, या शरीराचे चालक आहोत. स्त्री आणि पुरुष हा आत्म्यांमधील फरक केवळ दशम–द्वारापर्यंतच आहे. आपण जेव्हा ध्यान–अभ्यास करीत आत्म्यावरील स्थूल, सूक्ष्म, कारण ही आवरणे दूर सारून पारब्रह्मामध्ये पोहचतो, तेव्हा तेथे लिंगभेददेखील नाहीसा होतो; कारण आत्मा ना स्त्री आहे, ना पुरुष आहे. आपण स्थूल देहातून सूक्ष्म देहात जातो तेव्हा तेथे जाती–पातीचा संबंध नाहीसा होतो.

महात्म्यांनी ना कोणती जात बनविली ना कोणता समाज बनविला. ते ना नवीन धर्म बनविण्यासाठी येतात, ना अगोदर अस्तित्वात असलेला धर्म नष्ट करण्यासाठी येतात. ते आपणांस असेही सांगत नाहीत की तुम्ही आपल्या घरादाराची जबाबदारी त्यागून जंगल–पर्वतावर जा अथवा पर्वत–शिखरावर एकांतात जा. ते सांगतात की तुम्ही घराची जबाबदारी पार पाडत असता परमात्म्याची भक्ती करू शकता. त्याच्यासाठी दिवसातून तीन–चार तास काढीत जा कारण परमात्म्याने आपणांस सर्वकाही दिलेले आहे.

ज्यांनी आत्मा आणि माया यांचा अभ्यास केला आहे, त्यांना कल्पना आहे की आत्मा किती मौल्यवान वस्तू आहे? आत्म्याच्या अस्तित्वामुळेच आपले शरीर हालचाल करीत आहे, त्यास शोभा प्राप्त होत आहे.

प्रेमच परमात्म्याचे स्वरूप आहे. आपण सर्वांनी प्रेम–भावाने राहावयास हवे, आपल्या सोबत असलेल्या लोकांवर प्रेम करावयास हवे. महात्मा प्रेमाचा सागर असतात. संतांच्या अंतरात बसून परमात्माच प्रेमाचा संदेश देत असतो. संत जे काही सांगतात, ते आपल्या फायद्यासाठीच सांगतात. जे मनुष्य महात्म्यांच्या उपदेशानुसार जीवन जगतात त्यांना त्यांच्या जीवनकाळातच आकलन होते की त्याचा काय फायदा झाला आहे? मी आशा करतो की तुम्ही जे काही ऐकले आहे, त्यावर अंमल नक्कीच कराल.

***